divyamarathi.com
29, Jun | Bhusawal

# सामान्य ज्ञान स्पर्धेत अक्षय मराठे प्रथम

प्रतिनिधी | यावल



येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभाग व विद्यार्थी विकास समितीतर्फे, रविवारी सामान्यज्ञान स्पर्धेचे ऑनलाइन आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास, चौफेर वाचनाची आवड निर्माण व्हावी, स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण १९२ विद्यार्थी स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला. स्पर्धेत प्रथम क्रमांक बीएस्सीच्या प्रथम वर्षातील विद्यार्थी अक्षय दिलीप मराठे याने पटकावला. द्वितीय क्रमांक बीएसस्सी द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी नेहा सुधाकर झोपे तर तृतीय क्रमांक बी.ए. द्वितीय वर्षातील जीवन अविनाश कोळी याने पटकावला. तसेच उत्तेजनार्थ पुरस्कार जुबेर सत्तार पिंजारी व किरण भास्कर चौधरी यांना देण्यात आला. ही स्पर्धा प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. आयोजन मराठी विभाग प्रमुख डॉ. सुधा खराटे यांनी केले. उपप्राचार्य प्रा. ए .पी पाटील, प्रा. आर. डी .पवार यांनी सहकार्य केले.